



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक १४५ * नांदेड * रविवार, दि. १ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211













# सोनकिडा...!

## कथा

जुलै महिन्यातील शेवटच्या आठवड्याची एक सायंकाळ. चार वाजताची शाळा सुटल्यावर दफ्तर बाहेरुनच घरात फेकून वहादवाटेच्या शिवपरिसरात खुरपणासाठी गेलेल्या मायकडं वेगानं चाललो होतो. गुरुवारी घेतलेल्या नव्याकोऱ्या चप्पलेमुळे पाय झपाझप चालत होते. आकाशात ढग जमायला लागले होते. थंडगार वारा अंगाला झोंबत होता. पेरणी झाल्यानंतर बरेच दिवस पाऊस नव्हता. त्यामुळे वातावरणात झालेला बदल सगळ्यांनाच दिलासादायक होता. पीक छान तासोट्या लागलं होतं. काही ठिकाणी तणही भरपूर माजलं होतं. तासाभरातच मी पोहोचलो. माय अजूनही निंदतच होती. तिची पाचवी पात लागायला अवधी होता. तेव्हा मी खैराच्या झाडावर कुठे सोनकिडे दिसतात का ते पाहात तिथल्या तिथे भटकू लागलो. सोनकिड्यांचा लहानपणापासून प्रचंड नाद. त्याच्या मानेला पांढरा दोरा बांधून त्याला उडायला लावणं, त्याला कोवळी बारीक पानं खायला देणं, चावी नावाच्या काडीपेटीत घालून ठेवणे, त्याने एकदोन अंडे दिले का ते पहाणे, तपकिरी रंगाचा किंवा काळ्या रंगाचा सोनकिडा पकडायला फारच मजा वाटायची. आमच्या वाड्यातले बाबूदादा, कुसुमाक्का, सुनील तात्या, सिध्या, संजू तात्या आणि गल्लीतले पोरं गोतम्या, काळं गोतम्या, कुर्ब्या, जिवन्या अजून एक दोन रोजच रानातून सोनकिडे धरुन आणायचे. कुणाकडे किती आहेत हे पहायला आणि नर सोनकिडे किंवा तो काळ्या रंगाचा सोनकिडा कुणाच्या घरी आला तर ते पहायला धूम ठोकायची. शाळा सुटल्यावर घरीच राहिलो तर संध्याकाळी पोरं पोरं मिळून नागू महाराजाचे समदे शेरडं बिरडे फोडू-फोडू बांधायची. महाराजानं आम्हाला घोटरं फोडून खायची सवय लावली होती. आम्हाला हंगामानुसार चारंही मिळायचे. आखरावर राहायला आल्यावर हे सगळं सुटलं होतं. आज मी मायकडं आलो होतो. एकही सोनकिडा मला उडतांनासुद्धा दिसला नाही.

मायची पात लागल्याबरोबर ती काहीतरी शोधू लागली. तेवढ्यात मला तिने फार प्रेमाने हाक मारली. मी पळतच गेलो. मायनं काही लाकडं गोळा केले होते. काही गोवऱ्याही होत्या. सोनकिडे हुडकतांना मीही थोड्या गोळा केल्या होत्या. मायनं टोपल्यात गोवऱ्या टाकल्या, त्यात एक ईळा, दोन खुरपे, वाळलेले बिब्बे, जरमलचा तांब्या, एक डेचकी होती. मोठ्या युवकीनं ते व्यवस्थित रचून त्यावर गोळा केलेल्या वाळल्याकरड लाकडांचा हलकासा भारा ठेवला. सोबत नेलेल्या पटकराची चिंबळ केली. दिवसभर राबल्यानंतर घरी न्यायची ती दौलत डोक्यावर घेतली आणि दोघं मायलेकरं झपाझप पावलं टाकीत घराकडं निघालो. एव्हाना सगळंच अंधारुन आलं होतं. पावसाची चिन्हे होतीच. विजा आभाळात वाकुल्या दाखवित होत्या. मी मनातल्या मनात घाबरत होतो. माय बिलकूल घाबरत नव्हती. माय एक झाल बाई होती. जीवनसंघर्षाच्या वाटेवरची योद्धा होती. न घाबरता हातात शस्त्र धरुन कसं लढायचं ते मला शिकवित होती. पाऊस वाऱ्यावावदानासह आला. लाकडाचा भारा तिनदा हेलकावे खाऊ लागला. आम्ही दोघेही भिजून चेकोळ झालो. चालता चालता ती मध्येच थबकली. ती सडकंच्या बाजूला काहीतरी रोखून पाहू लागली. पाऊस जोराचा सुरु होता. माझ्या डोक्यावर तिने टोपलं दिलं आणि ती जवळच्या बराशीत उतरली. मी म्हणालो, 'माय कुठं चाललीस?' तेव्हा ती म्हणाली, 'नीट सडक धरुन पुढे चालत राहा!' मी पुढेच चालत राहिलो. अंधारात काहीच दिसत नव्हते. भित- भित पाऊल टाकू लागलो. माझ्या डोक्यावर असलेला मायचा संसार पुर्णपणे भिजून गेला. मी अधून मधून चमकणाऱ्या विजांच्या उजेडाचे बोट धरून चालत होतो. माय काहीतरी वस्तू छातीला धरुन ताडताड माझ्या जवळून पुढे गेली. तिने चढ पार केला. मी तिच्यापासून हातभर अंतरावर होतो. अजूनही पाऊस धारदारच होता. चढावर माय गेल्याबरोबर वीज कडाडली. त्याआधी क्षणभर आसमंत प्रकाशाने उजळून निघाला. पुर्वेकडून लख्खकन प्रकाशलेल्या उजेडात दिसलेली पाठमोरी माय मला अत्यंत ऐतिहासिक वाटली.

त्या दिवशी गावात आमच्या बाजूने शेवटी येणारे दोघेच होतो. जेवणयेळ झालीच होती. घरी अण्णा (वडील) आणि लहानुला भैय्या दोघेजण होते. अण्णानं दार काढलं आणि माय काहीच न बोलता तडक मधल्या घरात गेली. अण्णानं विचारलं, 'हे कुठं सापडलंय?' मायनं उत्तर दिलं नाही. 'या घरात', एवढेच ती म्हणाली. मधल्या घरात एक चिमणी टिमटिमत होती. मी घरात आलो आणि कोपऱ्यात टोपलं ठेवून मळक्या टायेलानं अंग पुसून काढलं. त्याचा कुबट वास येत होता. पण पर्याय नव्हता. आमच्या वाड्यात डावीकडून राहत होते ते केरबाबाबा- मरुमाय, लक्षीममाय- शेसुबाबा. रामाआज्या आणि त्याचे कुटुंब गावात राहात नव्हते. पऱ्याग आजी आधीच कधीतरी निवर्तली होती. जांबची माय आमच्या घरी बरेच दिवस राहून मेली होती. माडीवर मोठे बाबा- मोठीमाय, उजव्या बाजूला हिरकणआजी - मोत्याआजाचं भलं मोठं कुटुंब होतं. आम्ही सगळेच आमच्या प्रश्नांना पर्याय शोधत होतो. रोजच नव्या संकटांचा सामना करीत होतो. जीवनसंघर्षाची मजबूत हत्यारं हातात होतीच. ती सतत परजून घेत होतो. आम्हीच आमच्या जळत्या प्रश्नांना निकालात काढीत होतो.

चिमणीच्या उजेडात पावसानं झपाटलेलं शेळीचं लहानसं मादीपिल्लू मला एक नवं हत्यारच गवसलंय, असं भासलं. अण्णा आणि माय दबक्या आवाजात काहीतरी पुटपुटत होते. त्या पिल्लयाला कोरडं करुन उर्जा देत होते. पावसाच्या तडाख्यात ते मेलं असतं. मायनं त्याला जीवदान दिलं आणि त्याला ढाल बनविण्याचं स्वप्न तिच्या डोळ्यात तरळू लागलं. तेवढ्या उशिरा मायनं खिचडी केली. मी मटामटा खाऊन झोपी गेलो . भैय्या आधीच झोपला होता. मायनं ते लाकडं मोकळे केले. गोवऱ्याही पूर्ण भिजल्यानं त्याना वाळवणं आवश्यक होतं. परंतु त्यांचा आकार विकार आणि आधार बदलला होता. याचं काहीच वाईट तिला वाटत नव्हतं. एक नवं स्वप्नं डोळ्यात साठवून ती झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी मी दुपारच्या सुट्टीत घरी आलो. घरी अत्यंत सुतकी वातावरण होतं. अण्णा घरी नव्हते. भैय्या कुसुमाक्काकडे होता. घरात माय रडत बसली होती. मी काहीच बोललो नाही. इकडे तिकडे पाहिलं. शेळीचं पिल्लू गायब होतं. म्हणूनच माय रडत होती की काय? मी मायला भूक लागली! असं म्हणालो. मायनं जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं! मीही दुःखी झालो. माय काहीच बोलत नव्हती. मी कालचीच शिळी भाकर आणि फक्की मिरचू घेतलं आणि खात बसलो. खाणं झाल्यावर मी हासहुस करीत कुसुमाक्काकडं गेलो. कुसुमाक्का म्हणजे केरबाबाबा आणि मरुमाय ची शेवटची मुलगी. किसनआना आणि हरीआना दोन भाऊ. सरसअक्का आणि कुसुमाक्का ह्या दोन बहिणी. सरस अक्काला व्हंडाळ्यात दिलं होतं. कुसुमाक्का आम्हाला लई जीव लावायची. काय घडलं ते अक्कानं सांगितलं! सकाळीच नागूमहाराजाची बायको किसनाई घरी आली होती.

'अगय इस्ने आमचं शेळीचं पिल्लू आनलीस मनं?'

'नाही माय, तुमाला कोन मनलं?'

'भान्यानं मनला! चोर रांड, घरात लपवून ठिवलीस काय?'

'किसना आत्या तोंड संबाळून बोला!'

'चोर ते चोर आन वर शिरजोर?', 'काय न्याय हाय!'

बायांचा गलका ऐकून भानूतात्या आला, आणि म्हणाला,

'घरातच हाय पिल्लू, किसनाभाभी बघं घरात जाऊन!'

किसनाई तडक घरात गेली. कनगीच्या बाजूला बांधलेल्या पिल्याला दाव्यासकट बाहेर घेऊन आली. तिचा पारा चढला.

'हे पिल्लू आमच्या खांडातलं हाय, तू वडाळून आणलीस...चल चार मानसात.'

मायबी चेतली होती. ती ढालीसारखी उभी राहिली. तावातावाने बोलू लागली. ते शेळीचं पिल्लू कुठं सापडलं, त्याला घरी कसं आणलं, त्याला रातोरात वाचवून घेतलं याची गोष्ट सांगितली. मायचा आवाज चढला होता. गर्दी ऐकून तिच्या भावकीचे काही आणि आमच्या वाड्यातले समदेच गोळा झाले. तप्स्या मिटविला. ते नागू महाराजाच्या खांडातलंच पिल्लू आहे, हे सिद्ध झालं. अण्णानं ते मान्य केलं. किसनाई विजयी मुद्रेने ते करडू तिच्या घरी घेऊन गेली. आलेले माणसं पांगले. मायनं त्या लहानशा कोकराचा जीव वाचविला, ह्या बाबत कुणी काहीही बोललं नाही. शेवटी मायला 'चोर' हा शब्द जिव्हारी लागला होता.


ती पाट होती. तिला पोसून त्यापासून काही वाडवादिडवा करायच्या मायच्या दूरदृष्टीच्या मनसुब्यावर पाणी फिरलं होतं. त्यातून वाड्यातल्याच माणसानं फितूर होऊन सांगितल्यावर ती हतबल झाली होती. आगतिक झालेली माय एकदा अण्णाकडं आणि एकदा त्या पिल्लयाकडं पाहत होती. शेळी खरेदी करणं काही फार मोठी गोष्ट नव्हती. ते आताही करता येणार होतं. झालं गेलं माय विसरून गेली. पण शब्दांची दुखरी जखम मनात चिघळत होती. शारीरिक किंवा मानसिक वेदनांना कवटाळून बसण्याचे दिवस नव्हते ते. अण्णा बांधकाम मिस्त्री होते. माय मजूरी करायची. गावाच्या उत्तरेला चार एकर गायरान होतं. माझ्या जन्मापासून बरचसं पिकत होतं. मी शेताकडं गेल्यावर सोनकिडे पकडण्याचाच कार्यक्रम करीत असे. आता बोधवाड्यात आणि मांगोड्यात शेळीच्या पिल्लयाची व्हायना झाली. मायला आयाबाया विचारु लागल्या. काही टोमणे मारु लागल्या. नमंनमं करता पंचीम आली. मायला न्ह्यायला मामा आला. तेव्हा एकच कंधार लातूर एसटी बस होती. ती अकरा वाजता गावात यायची. साडेबारा वाजता तर शिरुर ताजबंदटच! दुपारी एक वाजता चापोलीला उतरुन गाडी असली हिंप्पळनेर तर बरं नाही तर पायीच जावं लागायचं. मीबी गेलो नायगावला. पायी चालता चालता सडकंच्या कडंचे कवळ्यालस पानांचे झाडं निरखून पहायचा मला नादच होता. कमरेएवढ्या गवतावर असलेले ते लांबुळगे पोपटी-निळसर-पारवे किडे सोनकिडे म्हणूनच हौस भागवून घ्यायची. दुसरेही धामुक्यासारखे काळे ठिपके असलेले वाळक्या गवती रंगाचे किडे उडतांना मजा यायची. या उडणाऱ्या किड्यांच्या पंखातून जो आवाज येत होता. तो मला फार आवडायचा.सोनकिड्यांना वेगवेगळ्या रंगांचे पंख असत. कधी कधी डोक्याचा भाग हिरवट पोपटी किंवा चमकदार निळसर किंवा काळ्यावर पांढरे ठिपके असायचे. पोटाकडूनही आकर्षक रंगसंगती असायची. कोणत्याही रंगांचे असले तरी सोन्यासारख्या चमकणाऱ्या सोनकिड्याला अंगावरुन चालवायला लावण्यात अनामिक आनंद होता. बोलत चालत आम्ही नायगावच्या शिवारात पोहोचलो. इथून तिथून भैय्याला मामानं घेतलं होतं. आता थोड्याच वेळात गावात शिरणार तेवढ्यात मला काड्याची डब्बी सापडली. तीव्र उत्सुकतेने मी ती डब्बी खोलली. त्यात एक रुबाबदार मोठा सोनकिडा होता. जिवंत होता. मी ती डब्बी कुडत्याच्या खिशात टाकली.

नायगावात घरी आल्याबरोबर धुरामायला बघून माय व्हां ि ि म्हणून रडू लागली. धुरामाय म्हणजे मायची माय. मामा हातपाय धुऊन बाहेर निघून गेला. विष्णूबाई कुरुळ्याहून आल्या म्हणून शेजारच्या मायच्या चुलतबहिणी, भावजया गोळा व्हायच्या. आत्ताबी त्या आल्या. सजामावशीलाही कुणीतरी सांगितलं. मग ती पण आली. ते सगळे रडत पडत बसले. त्यांच्याकडं हे असं गनगोत खूपच दिवसांत भेटल्यावर मायाबहिणींचा रडापडीचा एक कार्यक्रम उरकत असे. त्यानंतर सुखादुखाच्या गोष्टी व्हायच्या. शेतीभाती, पिकपाण्याच्या गोष्टी. मग चर्चा...कुणाला लेकरं किती, लुगडं चोळी, कोण गरोदर, कितवा महिना, कुणाचं जमलं, नाही जमलं, काय झालं, काय काय झालं...वगैरे वगैरे. या चर्चा रंगल्या होत्या. 'त्या' शेळीच्या पिल्याची गोष्ट मायनं सांगितली. मी दोरा हुडकून, सोनकिडा बांधून त्याला हवेत उडवित होतो. तो उडायचा आणि हातावर, खांद्यावर बसायचा. येतांना मी जुना पाला काढून टाकून डब्बीत बाभळीचा ताजा पाला घातला होता. मी पुन्हा सोनकिडा हवेत उडवायचो आणि तो जरासा उडाला की बसायचा. अंगावरुन चालायचा. हे मायनं बघितलं. ती चिडली. त्वरेने माझ्याकडे आली. माझ्या हातातील दोरा हिसकावून घेत म्हणाली, 'सोनकिड्यानं पोट भरना माय! आन इकडं.' माय चांगलीच माझ्यावर खेकसली. तिनं सोनकिडा दोऱ्यासकट हवेत दूरवर उडविला. 'माय पाट घेऊन देणाराय, आन ती तुलाच वळायच्याय, कळ्ळं का?' मी प्रचंड उदास झालो. सोनकिडा दूरवर निघून गेला. माझ्या जवळ रिकामी, जरासा बाभळीचा पाला भरलेली काडीपेटीच राहिली. तिला सापडलेलं पिल्लू किसनाईनं नेल्यावर जेवढं दुःख मायला झालं होतं, त्याहीपेक्षा मी जास्त दुःखी झालो होतो.

**-प्रज्ञाधर ढवळे,**
नांदेड

---

# गावमाती अन् माणसातील स्थित्यंतर मांडणारी कविता : 'एका वादळाच्या प्रतीक्षेत'



**पुस्तक परीक्षण**
**बाबाराव विश्वकर्मा**
नांदेड
मो. ९४०३४१८७१८

मराठी भाषेत आज खूप मोठ्या प्रमाणावर काव्य निर्मिती होत आहे. वर्तमानात कवितांचे पीक कुठेही खुरट्या डोंगरावर, रानावनात वारेमाप उगवत आहे. अशाच गाळगळाठ्याच्या काळात अनुभवाचं मोठं संचित जवळ असलेले काही कवी, काव्यनिर्मितेची जाण व वास्तवाचे भान सजग ठेवून लेखन करताना दिसत आहेत. त्यातील आवर्जून नाव घ्यावे असे कवी म्हणजे बालाजी तुमवाड हे आहेत.

बालाजी तुमवाड हे एक सच्चे, उपक्रमशील शिक्षक आहेत. ते जसे शाळेत संस्काराचे धडे देतात आणि भारताच्या भावी पिढीला घडवण्याचे महान काम करतात. तसेच ते लोकशिक्षक होऊन समाजाकडेही अगदी डोळस नजरेने पाहतात. समाजाला मूल्यात्मक मार्गावर नेण्याचा सातत्याने प्रयत्न करतात. ते फक्त बोलून थांबत नाहीत, तर शब्दांना कृतीची जोड देत 'सेवा समर्पण प्रतिष्ठान 'च्या माध्यमातून कृतिशील समाजकार्य करतात.

कवी बालाजी तुमवाड यांचे मागे २०२१ मध्ये 'तुका झाला खोटा' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर आता नांदेड येथील सुप्रसिद्ध इसाप प्रकाशनाने प्रकाशनसिद्ध केलेला 'एका वादळाच्या प्रतीक्षेत'काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ पुणे येथील सुप्रसिद्ध रंगकर्मी संतोष घोंगडे यांनी केलेले असून, प्रकाशक दत्ता डांगे यांनी आपल्या सृजनशील नजरेने पुस्तक सर्वांगसुंदर बनवलेले आहे. स्वतः प्रकाशकांनीच पुस्तकाच्या मलपृष्ठावर अभिप्राय देऊन पुस्तकाची उंची वाढवलेली आहे.

बालाजी तुमवाड यांची कविता विविध अंगी आहे जीवनाच्या बहुतेक अंगाला ती स्पर्श करत पुढे जाते.

आजवर मराठी भाषेचे कौतुक करणाऱ्या अनेक कविता, गीते, लिहिली गेलेली आहेत. त्यासाठी संत ज्ञानेश्वर, वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), विंदा करंदीकर, बा. सी. मर्ढेकर, सुरेश भट, वि. म. कुलकर्णी, संजीवनी मराठे यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतात. त्यांच्याच मार्गावरून चालतांना कवी बालाजी तुमवाड यांनी आपल्या 'शब्द मराठी' या कवितेत मराठी भाषेच्या सामर्थ्यस्थळांचे वर्णन केलेले आहे. ते म्हणतात..

किती चौफेर चौफेर
माझा मराठी सबूद
कोटी लेखणी भागल्या
त्याला पुरेना कागूद

आज चौफेर पसरलेल्या या अभिजात मराठी भाषेची सौंदर्यस्थळे आणि सामर्थ्यस्थळे असलेले संत ज्ञानोबा-तुकोबापासून इंद्रजीत भालेरावांपर्यंत, जनाई पासून बहिणाबाईपर्यंत, पठ्ठे बापूरावपासून सुरेखा पुणेकरांपर्यंत तिच्या सारस्वतपुत्रांनी मराठी भाषेचे वैभव कसे वाढविले त्याचे सुंदर वर्णन केलेले आहे. त्याबद्दल कवीने त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

कविता कशी जन्माला यावी याविषयी कवीची एक धारणा झालेली आहे. ती धारणा कवी 'कविता' या रचनेतून अभिव्यक्त होतांना दिसून येते. ते म्हणतात...

अशी जन्मावी कविता
वाहे जसा झरा जिता
नको नको बळजोरी
यमकाशी जुळविता

या जाणिवेतून त्यांची कविता कागदावर उतरते. नेणीवेच्या प्रांतातून इतक्या सहजतेने जाणिवेच्या अंगणात कविता रांगत रांगत येत दृश्यरूपात कागदावर अवतरली पाहिजे असा आशावाद कवी व्यक्त करतो.

कवी बालाजी तुमवाड यांची कविता म्हणजे अस्सल ग्रामीण अनुभवांची अभिव्यक्ती आहे. त्यांच्यावर बऱ्याच पूर्वसुरी कवींचा प्रभाव पडलेला आहे. त्यासाठी कृष्णाजी केशव दामले (केशवसुत), ना. धों. महानोर, सुरेश भट, इंद्रजीत भालेराव, बहिणाबाई चौधरी, विठ्ठल वाघ अशा कुलवंत कवींचे नाव घेता येईल. म्हणून त्यांच्या काही कविता व्यक्तीविषयी उद्दातीकरण करणाऱ्या आहेत. 'माय बहिणाबाई चौधरी' 'इंद्रजीत भालेराव' 'लता मंगेशकर' यांच्या कार्याने प्रभावित होऊन कवी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतात.

हा कवी शेतकरी, कास्तकऱ्यांच्या सामान्य कुटुंबातून आलेला असल्यामुळे गाव- गावपांढरी, शेती-माती, या विषयीची अनुभवश्रीमंती त्यांच्याकडे विपुल प्रमाणात आहे. पाढरपेशा वर्गातील सुखाच्या कल्पना ह्या काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना कधी स्पर्शही करत नाहीत. रात्रंदिवस पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी घामाचे सिंचन करणाऱ्याकडे तेवढी उसंत आहेच कुठे..?

शेती आणि मातीत खपणाऱ्या माणसचं दुःख व्यक्त करणं हा कवीच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. शेतकऱ्यांच्या दुःखाचे वर्णन करताना कवी त्यांच्या दयनीय परिस्थितीचे वर्णन करतो. रात्री-बेरात्री शेतात जाताना विंचूकिडा, साप यांची तमा न बाळगता शेतकरी रानावनात हिंडतो. ओल्या पायात हेकळनांचा काटा जेव्हा शेतकऱ्याच्या पायात शिरतो तेव्हा होणारी वेदनेची ठणक काळजापर्यंत जाणारी असते. हे सगळं दुःख त्यांच्याच वाट्याला आलेलं असतं, हे सांगताना कवी म्हणतो,

घाण्याच्या बैलाचे जीवन
मर्यादा चाकोरी रिंगणाची
डिरकणाऱ्या खोंडानाच का
मुभा असे झिंगण्याची ?
वचनामधले आम्ही पोशिंदे
वंचित जगती आलो
पोट जगाचे भरता भरता
आम्ही कुपोषित झालो

ही कास्तकारांची सलणारी वेदना आहे. कथा, कविता, कादंबऱ्यात जगाचा 'पोशिंदा' म्हणून त्याच्या जीवनाचे चित्रण केले जाते. पण तोच शेतकरी आज दैन्यवाणा होऊन कुपोषिताचे जीवन जगतो आहे. हे विपरीत जगणे त्याच्याच भाळी का आलेले आहे. असा प्रश्नही व्यवस्थेला विचारण्याचे धाडस बालाजी तुमवाड यांची कविता करते.

प्राचीन काळापासून भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. गाव खेड्यातील गरजांची पूर्तता ग्रामजीवनाला प्रवाहीत ठेवण्याचे काम 'बलुतेदारी' नावाच्या व्यवस्थेने केलेले होते. ही व्यवस्थाही फार चांगली होती असे नव्हे, तिच्याही काळजात विषमतेची आग धगधगती होती. बलुतेदार कष्टकऱ्यांचा स्वाभिमान पायदळी तुडवून समाजातील ठगेटोणग्यांनी केलेले अन्याय, अत्याचार व अपमानाचे घाव ही व्यवस्था नित्य सोसतच होती. अशा बिकट अवस्थेतही आपल्या भळभळणाऱ्या असंख्य जखमांना सावरत ग्रामजीवनाच्या उत्कर्षासाठी गावपंढरीची श्रमाने पूजा करणारा बलुतेदार आज देशोधडीला लागलेला आहे. आजच्या 'खाऊजा' सारख्या व्यवस्थेतून निर्माण झालेल्या अजस्त्र आधुनिक यंत्रदानवाने तिला पूर्णपणे गिळंकृत केलेले आहे. याची अतिशय सक्षमपणे सर्वस्वी जाणीव 'बलुतेदारी' या कवितेतून बालाजी तुमवाड यांनी करून दिलेली आहे.

वर्तमान आधुनिकीकरणातून गावपांढरीचे सारे रूपच पालटून गेलेले आहे. या यांत्रिकीकरणामुळे शेतीची जुने अवजारे तिफण,मेगडा,चाडे,निंदणं, खुरपं सारं संपत गेले, सणावारांचे रूप पालटत गेलं, चिखलमातीतून बनवलेली बैल जाऊन तेथे परदेशी चिनी मातीचे बैल आले. बलुतं गेले, बुलुतेदार गेले. उसनं-पासन् गेलं, पारावर बसनं-हसणं गेले हे सारे बदलेलं सोसतांना वृद्धमाणसांच्या चेहऱ्यावर उदासीनतेची छाया पसरली गेली. आमचा औत मोडला तेव्हा हे दुःख सहन न झाल्याने कवीचे वडील उपरण्याआड रडले होते. यांची खंत कवी मनाला आजही सतावते आहे. या परिवर्तनाच्या त्सुनामीत सारे गावपण नामशेष होत आहे. त्यात ग्रामसंस्कृतीचे सर्वस्व संपते की काय, ही धास्ती कवीला वाटते. शेवटी आधुनिकीकरण आणि भांडवलशाहीच्या कचाट्यातून वाचण्यासाठी कवी ईश्वराकडून काही माफक अपेक्षा करतांना म्हणतो...

देवा माझी बी लेकरं
दोन अक्षर शिकावी
गरिबांच्या पोरासाठी
शाळा मराठी टिकावी

कारण गरीब कास्तकरी शेतकऱ्यांना आपल्या लेकरांना महानगरांतील कार्पोरेट शाळेत शिकवणं होत नाही. त्यांना हवी असते मोफत शिकवणारी मराठी शाळा, ती टिकली पाहिजे अन् गोरगरिबांची लेकरं शिकली शिकली पाहिजे यासाठी कवी ईश्वरचरांकडे पसायदान मागतो.

जीवन ही एक परीक्षा आहे. येथे प्रश्न कधीच संपत नसतात. कधी ते प्रश्न आपल्या नात्यातून निर्माण झालेले असतात. तर कधी नात्याबाहेरील वर्तूळातून निर्माण झालेले असतात. असा माणूस आता बाहेरूनही कोसळतो. त्यांवेळी त्यांनी रंगवलेले स्वप्न दूरदूर अन् जीवन बेसूर दिसायला लागतं. मग अशावेळी प्रसंगी त्यांच्यावर मात करण्याचे बळ पूरवणारा कृष्णासारखा एखादा मित्र असावा असे कवीला वाटत राहते. कारण मित्र वणव्यात गारव्या सारखा असतो मनःशांतीचं एकमेव सुखद ठिकाण असतो. त्यासाठी या मायावी भवजालातून सोडविणारा एकमेव 'सखा' कोणी असेल, तर तो कर कटेवर ठेवून अठ्ठावीस युगांपासून विटेवर उभा असलेला पांडुरंग आहे यांची कवीला जाणीव आहे. म्हणून विठ्ठलाच्या नावाने अभंगातून गाऊ लागतो..

जेव्हा पडे नजरेस, मूर्ती सावळी धाकुटी,
ध्येय, ध्याता,ध्यान झणी मावळे त्रिपुटी
तुझ्या नामात गुंतता, मनी आनंदाचा डोह
जीव होय वारकरी, दूर पळे माया मोह

त्या विठ्ठलाची सावळ्या मूर्तीचे दर्शन हेच भक्तांची संजीवनी आहे. तोच अंतरीच्या कोलाहलाचा सर्वनाश करून निर्विकल्प मुक्तीचा दाता आहे. नामसंजीवनी साधन भक्ताकडे आहे. त्यांच्या सामर्थ्याने षड्रिपू वर विजय मिळवता येते. असा दृढ विश्वास निश्चितच कवी बालाजी तुमवाड यांच्याकडे आहे. कवी बालाजी तुमवाड यांची कविता गावमाती आणि माणसांच्या स्थित्यंतराची गदगदती स्पंदने टिपत राहते. माणसांना शेती, माती, संस्कृती, शिक्षण आणि मानवीय मूल्यांची महती सांगते. ती शाश्वत मूल्ये समाजात रूजली पाहिजे यासाठी सदैव धडपडते. बालाजी तुमवाड यांची लेखणी हे नैतिकतेचं बळ घेऊन सदैव पाझरत राहो या सदिच्छेसह त्यांना भावी लेखनकार्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**-'एका वादळाच्या प्रतीक्षेत' (काव्यसंग्रह)**
**-कवी : बालाजी तुमवाड**
**-इसाप प्रकाशन, नांदेड**
**-मुखपृष्ठ: संतोष घोंगडे, पुणे**
**-मूल्य: २०० रू.**

---

# देविदास पवारांची सेवापूर्ती : एक आनंद सोहळा

देविदास पवार हे भिवंडी येथील महानगरपालिकेच्या आयुक्त पदावरून सेवानिवृत्त होत आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेत प्रथम नगरपालिका मुख्याधिकारी म्हणून अंबरनाथ, बदलापूर, लातूर, परळी वैजनाथ, यवतमाळ येथे उत्तम सेवा केल्यावर पदोन्नतीने महानगर पालिकेचे आयुक्त म्हणून परभणी, अमरावती आता भिवंडी येथून सेवा निवृत्त होत आहेत. त्यांनी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात मोठ्या स्वाभिमानाने कर्तव्यनिष्ठपणे सेवा बजावली आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा नेहमीच गौरव होत आला आहे. म्हणून त्यांच्या सेवापूर्तीचा जन्मभूमीच्या जिल्हास्तरावर गौरव व्हावा म्हणून कुटुंबीय आणि स्नेहीजणांनी नांदेडच्या कुसुम सभागृहात १ जून २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हा आनंददायी सोहळा आयोजित केला आहे.



देविदास पवारांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहिली तर एका मराठा कुणबी सामान्य शेतकरी, कष्टकरी परिवारातील ते आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील निवघा येथील वारकरी संप्रदायातील अल्पशिक्षित, पण प्रगतशील विचारांची आई गिरजाबाई व वडील गंगाधरराव पवार या सत्शील दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचा मोठा भाऊ सेवानिवृत्त वनाधिकारी तथा मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री कामाजी पवार पाठचा देविदास पवार, सकारात्मक विकासाची दृष्टी घेऊन गावगाडा, समाजकारण, राजकारण करणारे उद्धवराव पवार, आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. विश्वंभर पवार या चौघा भावांचे एकोप्याने राहून प्रगती करणारे हे एक जिल्ह्यातील आदर्श कुटुंब आहे. हे कुटुंब मातृत्वाचा सन्मान करीत. एकमेकांचे ऐकून सामाजिक भान जपत इंजि. पुरुषोत्तम खेडेकर यांचे 'नवे विचार, नवी कृती' अंगीकारून वागत असतात. त्यांच्या माता-पित्यांचे चांगले संस्कार, वागणूक, परिश्रमाचा वसा या पुत्रांनी घेतला आहे. कुठं वाकायचं आणि कुठे ताट व्हायचे हे त्यांना समजले आहे. कुठे खर्च करायचा, कुठे करायचा नाही हेही त्यांना समजते, म्हणून तर या कुटुंबाची आर्थिक प्रगती खूप छान झाली आहे.

देविदास पवार यांच्या जन्मगावची मातीच अन्याया विरुद्ध बंड करणारी आहे. निजामाच्या अन्यायाविरोधात बंड करणारे खोडं येथे जन्माला आलीत. अज्ञान, अंधश्रद्धा, वाईट चालीरितीच्या विरोधात बंड करण्याचे धाडस मराठा सेवा संघाच्या माध्यमातून येथे आले आहे. याच मातीतले देविदास पवार हे आजपर्यंत नोकरी करीत असताना आपल्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी अथवा पदाधिकारी यांच्याकडून अन्याय सहन केला नाही. नात्यातील आमदार, पुढारी असतानाही त्यांच्या नावाचा गैरवापर करून कामचुकारपणा केला नाही.उलट आपणाकडे असणाऱ्या कामकाजाचे नियंत्रण आणि अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे करीत आले आहेत. आपल्या हाताखाली विविध विभागाची सुयोग्य देखरेख करीत आले आहेत. शहराला सार्वजनिक सुविधा मिळवून देण्यात त्यांचा सतत पुढाकार राहिला आहे. नागरिकांशी सतत सुसंवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेत त्यांना योग्य ती माहिती देत आले आहेत. सामान्य नागरिकांच्या समस्यांवर वेळच्यावेळी उपायोजना करीत आले आहेत.आपल्या हाताखालच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कामकाज पाहून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करीत आले आहेत. ज्या शहरात नोकरी केली, त्या शहरांच्या प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आले आहेत. प्रामाणिकपणे आपली नोकरी पार पाडताना त्यांनी आपल्या कुटुंबाकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. या कामी त्यांची पत्नी सौ. मनीषा पवार यांनीही नेटाने जबाबदारी पार पाडत नांदेडच्या प्रसिद्ध मातोश्री प्रतिष्ठानच्या विद्यमान संचालिका म्हणून भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत. आपल्या मुलावर संस्कारक्षम शिक्षण देण्यातही त्या कमी पडल्या नाही. आपल्या प्रशासकीय व कौटुंबिक जबाबदारी बरोबरच आपल्या जन्मभूमीच्या जिल्हा परिषदेच्या शाळा वडीलाच्या स्मरणार्थ आपल्या उपस्थितीत संपूर्ण डिझिटल करून दिली आहे. त्यांनी शाळेला अत्यावश्यक साहित्य दिल्याचे शाळेवरील शिक्षकांनी मला सांगितले आहे.

आपल्या जिल्ह्यातील सेवा बजावणाऱ्या व जिल्ह्यातील देशभर सेवा बजावणाऱ्या भूमिपुत्र असणाऱ्या सर्व खात्याच्या राजपत्रित अधिकाऱ्यांचा मागील पाच-सहा वर्षांपासून नांदेड शहरात दरवर्षीच दीपावलीला स्नेहमिलन मेळाव्याच्या आयोजनात यांचे मोठे बंधू व बालाजीराव खतगावकर यांच्यासारख्या मित्रांबरोबर त्यांची मोठी भूमिका असते. या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील नूतन अधिकारी बनलेल्यांचाही सन्मान केला जातो. यातून एकमेकांची ओळख होते. एकमेकांचा स्वभाव समजतो. वेगवेगळ्या खात्यात समन्वय राखून जिल्ह्याचा विकास होण्यास मदत होते. अधिकाऱ्यांना काम करण्यास ऊर्जा मिळते. या कार्यक्रमास जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, सर्व खात्याचे कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, शिक्षणाधिकारी सर्व अधिकारी उपस्थित राहतात. यात मोठ्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनातून खूप काही शिकायला मिळते. यात देविदासरावांची भूमिका महत्त्वाची असते. ते अत्यंत नम्रपणे, मनमोकळेपणाने सर्वांशी बोलत सुसंवाद संवाद साधत फिरत असतात. त्यातून त्यांचा मनमोकळा स्वभाव, मला जवळून पाहता आला.

देविदासराव पवार अशा या निगर्वी, कर्तव्यदक्षपणे काम करणाऱ्या महानगरपालिका आयुक्त म्हणून सेवापूर्ती केलेल्या या व्यक्तिमत्त्वाचा आनंददायी सोहळा मित्रपरिवार आणि आप्तेष्टांच्या उपस्थितीत होत आहे. शासकीय सेवापूर्ती निमित्ताने त्यांना आयुरारोग्य लाभून मानव हिताचे काम त्यांच्या हातून घडो ही सदिच्छा!

**-पंडित पवळे,**
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

---

## वेदनेचा अबोल हुंकार

कुठवर सोसायचा हा
भीषण वैशाख वणवा
संस्कृतीत पूजा अन्
व्यवहारात माणुसकीची वाणवा
द्रोपदीच्या वस्त्रहरणाचा
सारा दरबार साक्षीला
श्रीकृष्णाचे अस्तित्त्व आता
आधार काळाबरोबर हरपला
आता नाही येणार श्रीकृष्ण
ही संधी ओळखून अत्याचारी
राजरोसपणे मिळून, कळ्या-कुस्करतात व्यभिचारी
कधी निर्भयाची आर्त किंकाळी
माणुसकीनं मान खाली घातली
नित्य अत्याचारानं लक्तरं स्त्री अब्रुची
माणुसकीच्या वेशीला टांगली
अजून किती कळ्या खुडल्या
असतील रात्रीच्या अंधारात
शिताएवढे सत्य म्हणे
येते उजेडात. माणुसकीची लाज वाटावी
अशी ही असतात का माणसं
क्षणभर देव म्हणावा असेल
मीच निर्मिली का माणसं
पशुसमान जगण्याची रीत
स्त्री-पूजनाचा मूक अंगार
खोट्या प्रतिष्ठेच्या पायी
घुमतो वेदनेचा अबोल हुंकार.

**-अनिता दाने-जुंबाड**
नांदेड

# पावसाळ्यापूर्वीच सहस्रकुंड धबधबा झाला फुल्ल; पर्यटकांना खुणावतोय



**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर असलेल्या किनवट तालुक्यातील इस्लापूर शिवारातील सहस्रकुंड धबधबा पावसाळ्यापूर्वीच ओसंडून वाहत आहे. हा नैसर्गिक धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांना तो एक प्रकारे खुणावत असल्याने पर्यटकांची पावले तिकडे वळत आहेत.

नांदेडसह हिंगोली, यवतमाळ जिल्ह्यांत सातत्यानं बरसलेल्या अवकाळी पावसामुळे पैनगंगा नदी प्रवाहित झाली आहे. त्यामुळं इस्लापूरजवळ असलेला 'सहस्रकुंड धबधबा' प्रवाहित झाला आहे. ऐन मे महिन्यात धबधबा प्रवाहित होण्याची ही मागील अनेक वर्षातील पहिलीच वेळ आहे. त्यामुळे धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची पावले आता सहस्रकुंडकडे वळत आहेत.

मागील काही दिवसांपासून नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्याच्या सीमेवर सुरू असलेल्या पावसामुळे पैनगंगा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. यामुळे साधारणतः जून-जुलै महिन्यात प्रवाहित होणारा प्रसिद्ध सहस्रकुंड धबधबा या वर्षी मे महिन्याच्या अखेरीसच पूर्ण क्षमतेने वाहू लागला आहे. मान्सूनपूर्व काळातच धबधब्याचे हे विहंगम दृश्य पाहण्यासाठी पर्यटक आणि स्थानिक नागरिकांची गर्दी होत आहे. उन्हाळ्यात पैनगंगा नदीचे पात्र कोरडे पडते. त्यामुळे सहस्रकुंड धबधब्याचा प्रवाह थांबलेला असतो. मात्र, यावर्षी मे महिन्यातच परिसरात झालेल्या जोरदार अवकाळी पावसामुळे नदी भरून वाहत आहे. पाण्याच्या वाढलेल्या प्रवाहामुळे सहस्रकुंड धबधबा पुन्हा जिवंत झाला आहे. सुमारे २० मीटर उंचीवरून कोसळणाऱ्या पाण्याच्या आवाजानं आणि तुषारांनी संपूर्ण परिसर नयनरम्य बनला आहे.

**स्थानिकांसाठी आश्चर्य आणि आनंद**

मे महिन्यातच सहस्रकुंड धबधबा वाहू लागल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आश्चर्य आणि आनंदाचं वातावरण आहे. अनेक जण हा अनपेक्षित आणि सुखद बदल पाहण्यासाठी धबधब्याच्या ठिकाणी गर्दी करत आहेत. पर्यटकांनी देखील या संधीचं सोनं करत नैसर्गिक चमत्काराला कॅमेऱ्यात कैद करण्यास सुरुवात केली आहे.

**प्रशासनाचं पर्यटकांना आवाहन**

धबधब्याच्या नयनरम्य दृश्याने आनंद पसरला असला तरी दुसरीकडे प्रशासनानं नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. पाणीपातळीत अचानक वाढ होण्याची शक्यता असल्यान पर्यटकांनी धबधब्याजवळ जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**मराठवाड्यातील सर्वात मोठा धबधबा**

सहस्रकुंड धबधबा हा मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर आहे. या धबधब्याचा काही भाग यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात येतो. तर काही भाग नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात येतो. सहस्रकुंड धबधबा पैनगंगा नदीवर आहे. ही नदी मराठवाडा आणि विदर्भाला विभाजित करते. नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यातील पर्यटकांसोबतच हा धबधबा महाराष्ट्रभरातील पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. नदीचा प्रवाह एका मोठ्या खडकानं विभागला जातो. ज्यामुळं पाणी दोन वेगळ्या प्रवाहांमध्ये येते.

# नांदेड पोलीस परिक्षेत्रांतर्गत ७५ अधिकाऱ्यांच्या बदल्या

## बिच्चेवार लातूरला, रोडे परभणीत, मिरकले, बोलमवाड पुन्हा नांदेडला

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड पोलीस परिक्षेत्रातील पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक आणि उपनिरीक्षकांच्या विहित कालावधी पूर्ण झाल्याने विनंती आणि प्रशासकीय कारणास्तव पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी बदल्या केल्या आहेत.

जिल्ह्यातील ७५ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून यामध्ये ३७ पोलीस उपनिरीक्षक, २८ सहायक पोलीस निरीक्षक आणि १० पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे. संबंधित पोलीस अधीक्षकांनी या बदली आदेशाची प्रत पोलीस अधिकाऱ्यांना बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे, बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी अथवा बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाट पाहू नये, असे आदेशही शहाजी उमाप यांनी दिले आहेत.

नांदेड पोलीस परिक्षेत्रातून २१ पोलीस उपनिरीक्षकांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. तर १६ उपनिरीक्षकांची प्रशासकीय कारणास्तव परिक्षेत्रात इतर जिल्ह्यात बदली करण्यात आली आहे. प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षकां मध्ये नांदेड येथील आशिष बोराटे, दामिनी ननवरे, योगेश बोधगिरे, बाबू शिंदे, बालाजी नरवटे, राजेश जाधव, आयुब शेख आणि श्यामल देशमुख यांना कार्यरत ठिकाणी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. भूषण कांबळे नांदेडहून हिंगोलीला, उमेश रायभोळे, आनंद बिचेवार, गोपाळ इंद्राळे यांची नांदेडहून लातूर, विश्वजीत रोडे यांची नांदेडहून परभणीला, महेंद्र कुमार पोपलवार यांची परभणीहून नांदेडला, नागनाथ पाटील यांची परभणीहून हिंगोलीला आणि संदीप यामावार यांची हिंगोलीहून नांदेडला प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे.

पोलीस उपनिरीक्षकांच्या २१ विनंती बदल्यामध्ये प्रकाश कुकडे यांची नांदेडहून परभणीला, अमर केंद्रे, मुक्तीराम येवले यांची नांदेडहून लातूरला, राम जगाडे, नारायण शिंदे यांची नांदेडहून परभणीला, रामधन डोईफोडे यांची परभणीहून लातूरला, विजय पंतोजी, सूर्यकांत काठोडे, भारत सावंत, सुदर्शन इंगोले, शंकरराव देशमुख, गौतम वाहुळे, प्रशांत जाधव, हेमंत देशपांडे, सचिन सोनवणे यांची परभणीहून नांदेडला, मुजाहिद शेख यांची परभणीहून लातूरला, मीनाक्षी राखोडे यांची परभणीहून हिंगोलीला, पुंडलिक मोहिते यांची लातूरहून परभणीला, टोपाजी कोरके यांची लातूरहून नांदेडला, मारोती सोनकांबळे यांची हिंगोलीहून नांदेडला आणि माजिद मोहम्मद यांची हिंगोलीहून परभणीला बदली करण्यात आली आहे.

परिक्षेत्रांतर्गत २८ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १८ प्रशासकीय तर १० विनंती बदल्यांचा समावेश आहे. विनंती बदल्यांमध्ये बालाजी गायकवाड, अजिनाथ पाटील आणि मुंजाजी दळवे यांची नांदेडहून परभणीत तर नाना लिंगे यांची नांदेडहून लातूरला, मुख्तार सय्यद, कृष्णा घायवट आणि प्रभाकर कापुरे यांची परभणीहून लातूरला, नरसिंह आनलदास व विशाल वाठोरे यांची लातूरहून नांदेडला आणि बालाजी महाजन यांची हिंगोलीहून नांदेडला बदली करण्यात आली आहे.

सहायक पोलीस निरीक्षकांच्या प्रशासकीय बदल्यामध्ये संजय निलपत्रेवार, दुर्गा बारसे, संकेत दिघे, महादेव पुरी, राजू वटाणे, संदीप बोरकर, भाऊसाहेब खंदारे, प्रवीण राठोड आणि भीमाशंकर गायकवाड यांना कार्यरत जिल्ह्यात एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. शंकर डेडवाल यांची नांदेडहून हिंगोलीला, श्रीनिवास राठोड, भालचंद्र तिडके व संतोष केदासे यांची नांदेडहून लातूरला, प्रभाकर कवाळे, नरसिंग पोमनाळकर, विक्रम हराळे यांची परभणीहून नांदेडला, दिपाली गीते यांची लातूरहून परभणीला आणि मो. रियाज शेख यांची लातूरहून नांदेडला बदली करण्यात आली आहे.

दहा पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांमध्ये तीन बदल्या या प्रशासकीय कारणावरून आहेत त्यामध्ये नामदेव रिठे यांची नांदेडहून परभणीला, संजीवन मिरकले यांची लातूरहून होऊन नांदेडला आणि गणेश कदम यांची लातूरहून परभणीला बदली करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षकांच्या विनंती बदल्यां मध्ये विनोद मेत्रेवार व विश्वनाथ झुंजारे यांची नांदेडहून लातूरला, बालाजी मोहिते आणि बुद्धीराज सुकाळे यांची परभणीहून लातूरला चिंताभर कामठेवाड आणि सूर्यमोहन बोलमवाड यांची परभणीहून नांदेडला तर शरद मरे यांची परभणीहून हिंगोलीला बदली करण्यात आली आहे.

बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत हजर न झाल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई सुरू करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केल्याचा आणि ते बदलीच्या घटकात हजर झाल्याचा अहवाल त्याच दिवशी ई-ऑफिसद्वारे नांदेड परिक्षेत्र कार्यालयाला कळवण्याचे निर्देश पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिले आहेत.

# नांदेड जिल्ह्यातील ९ नायब तहसीलदारांच्या बदल्या; मकरंद दिवाकर हिमायतनगरला

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने जिल्ह्यातील ९ नायब तहसीलदारांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. याबाबतचे शासकीय आदेश राज्यपालांच्या आदेशानुसार राज्य शासनाचे कार्यासन अधिकारी श्रीकांत मोहिते यांच्या स्वाक्षरीनिशी निर्गमित करण्यात आले आहेत.

शासनाच्या आदेशानुसार, अधार्पूर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (निवडणूक) सुनील माचेवाड यांची बदली नांदेड तहसील कार्यालयात नायब तहसीलदार (महसूल-२) येथे करण्यात आली आहे. हिमायतनगर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (निवडणूक) एस. व्ही. ताडेवाड यांची बदली अर्धापूर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार (निवडणूक) पदी करण्यात आली आहे. देगलूर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल-२) बालाजी सुरनर यांना सध्या कार्यरत पदावर सेवानिवृत्तीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल दंडाधिकारी शाखा) मकरंद दिवाकर यांची बदली हिमायतनगर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल १) या पदावर करण्यात आली आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल सामान्य शाखा) उषा इज्जपवार यांची बदली नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल) दंडाधिकारी शाखा येथे करण्यात आली आहे. धर्माबाद तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल १) परमानंद गावंडे यांना सध्या कार्यरत पदावर एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. माहूर तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल १) राजकुमार राठोड यांची बदली परभणी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल २) या पदावर करण्यात आली आहे. नांदेड तहसील कार्यालयातील **(पान ५ वर...)**

# भाजप: दोन्ही जिल्हाध्यक्षांना पुन्हा मिळाली संधी!

## संतुकराव हंबर्डे आणि किशोर देशमुख यांची फेरनियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाच्या नांदेड जिल्हाध्यक्षांची निवड शनिवार, दिनांक ३१ मे रोजी करण्यात आली. यात नांदेड दक्षिणच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. संतुकराव हंबर्डे तर नांदेड उत्तरच्या जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अध्यक्षाची निवड झाल्याची फेक यादी प्रसारमाध्यमांवर फिरत होती. अखेर तीच यादी अंतिम करण्यात आल्याचे आजच्या निवडीवरून स्पष्ट झाले.




महिन्याभरापूर्वी भारतीय जनता पक्षाचे निरीक्षक नांदेडमध्ये येऊन भाजपच्या जिल्हाध्यक्षपदासाठी कोण कोण इच्छुक आहेत, याची माहिती घेतली होती. इच्छूक उमेदवार ४५ ते ६० या वयोगटातील असावा या प्रमुख अटीसह, पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता असणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. त्यात डॉ. संतुक हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख यांची नावे प्रारंभापासून चर्चेत होती. भाजप मंडळ अध्यक्षांच्या निवडीनंतर जिल्हाध्यक्षपदासाठी निवडीची प्रक्रिया सुरू झाली. काही दिवसांतच सोशल मीडियामध्ये जिल्हाध्यक्षांची एक यादी सर्वत्र फिरत असल्याचे दिसून आले. परंतु ती निवड यादी फेक असल्याचे सांगत भाजपच्यावतीने लवकरच जिल्हाध्यक्षांची घोषणा होईल, असे सांगण्यात आले. त्यामुळे इच्छुकांनी आपापल्या परीने फिल्डींग लावण्याची तयारी केली होती. परंतु शनिवार, दि. ३१ मे रोजी झालेल्या घोषणेनंतर फेक यादीच अंतिम करण्यात आल्याचे प्रदेश निवडणूक अधिकारी आ.चैनसुख संचेती यांच्या पत्रावरून स्पष्ट झाले. या निवडीमुळे डॉ. हंबर्डे व ॲड. देशमुख यांना पुन्हा संधी मिळाली आहे.


पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308


# काँग्रेसतर्फे अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन




**नांदेड (प्रतिनिधी)–** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त येथील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास एकनाथ मोरे, प्रा.यशपाल भिंगे, माजी उपमहापौर अब्दुल गफार, आनंद चव्हाण, प्रफुल्ल सावंत, रेखा चव्हाण, श्रावण रॅपनवाड, महेश देशमुख, उध्दवराव लांडगे, राजेश पावडे, कुमार कुर्तडीकर, सत्यपाल सावंत, अतुल पेद्देवाड, विठ्ठल पावडे, बाबुराव पांडागळे, इंजि. नसीम पठाण, ज्योती कदम, शिवनंदा देशमुख, हंसराज काटकांबळे, अनिल कांबळे, अनिल उबाळे, श्याम पाटील, नंदकिशोर देशमुख, वसंत जाधव, गौतम शिरसाठ, दीपकसिंघ हजुरिया, अजीज कुरेशी, दिना पाटील, दादाराव पुयड, मुक्तार शेख आणि रामचंद्र देठे आदी पदाधिकारी-कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.






# आ. चिखलीकर यांच्या साई सुभाष संपर्क कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ३१ मे रोजी लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर येथील साई सुभाष या संपर्क कार्यालयात अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह माजी आमदार मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हाध्यक्षा सुनंदाताई जोगदंड, शिवराज पाटील होटाळकर, बालाजी शिंदे, प्रदेश सचिव सुनील नानवटे, उदय चव्हाण, कन्हैया कदम, बाबुराव कदम, संगीता कामठेकर, प्रतिभा रत्नपारखी, संभाजी मुकनर, बालाजी शेळके, निळू पाटील, शंकर काळे, ॲड. नाज परवीन, कुसुम पेकम, रेखा धबाले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनेक पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.


फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com

# चंदेरी

# जुही चावलाचा नवरा कर्जामुळे झाला होता उद्ध्वस्त; आता २००० कोटींचा मालक!

**आजवर अनेक बॉलीवूड चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी प्रसिद्ध अभिनेत्री म्हणजे जुही चावला. जुही सध्या मोठ्या पडद्यापासून दूर असली तरी, खासगी आयुष्यामुळे ती चर्चेत येत असते. करिअरच्या शिखरावर असताना जुहीने तिच्यापेक्षा पाच वर्षे मोठ्या जय मेहता यांच्याशी लग्न केलं. जय मेहता हे मोठे उद्योजक आहेत. जय मेहतांची कहाणी ही एखाद्या चित्रपटाच्या किंवा सीरिजच्या कथेसारखीच आहे.**

जय मेहता यांचा जन्म एका प्रसिद्ध उद्योगपती कुटुंबात झाला. त्यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित महाविद्यालयांमधून अभियांत्रिकी आणि व्यवसायाचे शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण करून ते भारतात परतले. तेव्हा त्यांनी कुटुंबाचा व्यवसाय पुढे नेण्याची जबाबदारी घेतली. पण सुरुवातीला त्यांना अपयशाचा सामना करावा लागला होता. आज २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या मालमत्तेचे मालक असलेले जय मेहता एकेकाळी कर्जात बुडाले होते. या कठीण काळावर मात करत त्यांनी पुन्हा एकदा स्वतःचा व्यवसाय उभारला आणि हे कौतुकास्पद आहे. त्यांचा व्यवसाय कठीण काळातून जात होता, तेव्हा त्यांनी क्रिकेट क्षेत्रात गुंतवणूक केली. याबद्दल त्यांना अनेकांनी 'वेडा' ठरवलं होतं; पण तरीही जय यांनी स्वतःवर विश्वास ठेवत ही गुंतवणूक केली. जय मेहता हे आयपीएलच्या 'कोलकाता नाईट रायडर्स'चे सहमालक आहेत. या संघात त्यांची शाहरुख खानबरोबर भागीदारी आहे. इन्स्टिट्यूट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट आयएमडीच्या यूट्यूब चॅनेलवर शेअर केलेल्या चॅटमध्ये जय त्यांच्या क्रिकेटमधील गुंतवकीबद्दल म्हणाले, की माझा व्यवसाय कठीण काळातून जात होता, तेव्हा त्यांना क्रिकेटमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळाली. त्यांनी टीम खरेदी करण्यासाठी ७५ दशलक्ष डॉलर्स गुंतवले होते. यापुढे जय असं म्हणाले, की ही गुंतवणूक खूपच लहान होती, परंतू, त्यांना खात्री होती की भविष्यात क्रिकेटचं हे क्षेत्र खूप व्यापक होणार. अगदी अमेरिकेतील एनएफएल किंवा युरोपातील फुटबॉलप्रमाणेच. तेव्हा त्यांनी ही संधी ओळखली आणि गुंतवणूक केली. ही गुंतवणूक त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गुंतवणूक ठरली होती. त्यामुळे आज जय मेहता यांची एकूण संपत्ती सुमारे २००० कोटी इतकी आहे. दरम्यान, जुही आणि जय मेहता यांच्याबद्दल सांगायचं झालं तर, १९९५ मध्ये दोघांनी लग्न केलं. जुही चावला ही जय मेहता यांची दुसरी पत्नी आहे. जुही आणि जय मेहता यांच्या आयुष्यातून महत्त्वाच्या व्यक्ती निघून गेल्यामुळे दोघांच्या डोक्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. या कठीण काळात जुही व जय मेहता यांनी एकमेकांची साथ दिली. अनेक वर्षे मित्र म्हणून राहिल्यानंतर अखेर या दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला.



## 'हेरा फेरी 3'चे कॉपीराईट्स अक्षयकडेच

'हेरा फेरी ३' हा चित्रपट गेल्या काही दिवसांपासून अनेक कारणांनी चर्चेत येत आहे. चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर अनेक चाहत्यांनी आनंद व्यक्त केला, पण काही दिवसांपूर्वी अभिनेते परेश रावल यांनी या चित्रपटातून बाहेर पडत असल्याची घोषणा केली. तेव्हापासून या चित्रपटाबद्दलच्या अनेक चर्चा सुरू आहेत. आता हे प्रकरण चित्रपटाच्या कॉपीराईट्सवर येऊन थांबलं आहे. परेश रावल यांच्या बाहेर पडल्याच्या घोषणेनंतर निर्माता, अक्षय कुमारकडून परेश यांना नोटीस पाठवण्यात आली



होती. परेश रावल यांच्या वकिलांनी या नोटीसला उत्तर देत नमूद केले होते की, चित्रपटाचे कॉपीराईट्स फिरोज नाडियाडवाला यांच्याकडे आहेत आणि त्यांनी परेशसह इतर कलाकारांनी चित्रपटासंबंधित काहीही कृती न करण्याची नोटीस पाठवली होती. तसंच परेश यांच्या वकिलांनीही त्यांचं चित्रपटामधून बाहेर पडण्याचं हेच कारण असल्याचं म्हटलं होतं. अशातच आता या कॉपीराईट्स प्रकरणी दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रियदर्शन यांनी म्हटले आहे की, अशा आरोपांमुळे ते 'नाराज' आहे. त्यांनी फिरोज नाडियाडवाला हे 'हेरा फेरी'च्या फ्रँचायझीचे आयपीआर (बौद्धिक संपदा हक्क)चे मालक आहेत या वृत्तांचं खंडन केलं. याबद्दल ते म्हणाले, की अक्षयने 'हेरा फेरी' फ्रँचायझीचे संपूर्ण हक्क फिरोज नाडियाडवाला यांच्याकडून १० कोटी रुपयांना विकत घेतले आहेत. यापुढे ते म्हणाले, की हे फक्त 'हेरा फेरी ३'साठी नाही, तर संपूर्ण फ्रँचायझीसाठी आहेत. मला हे माहीत आहे. कारण मी त्याचे कागदपत्र पाहिले आहेत. याबद्दलचे सगळे कागदपत्र अक्षयने मला दाखवली. ज्यात साजिद नाडियाडवालाचे हक्क असलेले कागदपत्रेदेखील आहेत. पेपर्स पाहिल्यानंतरच मी चित्रपट दिग्दर्शन करण्यास होकार दिला. दरम्यान, परेश रावल यांच्या चित्रपटातून बाहेर पडण्याच्या घोषणेवर अक्षयनेही प्रतिक्रिया दिली. 'हाउसफुल्ल ५'च्या ट्रेलर लाँचवेळी अक्षयने याप्रकरणी असं म्हटलेलं की, मी परेश रावल यांच्याबरोबर गेली ३२ वर्षे काम करत आहे. आम्ही खूप चांगले मित्र आहोत आणि ते खूप कमाल अभिनेते आहेत. मी त्यांच्याकडून खूप काही गोष्टी शिकलो आहे. जे काही झालं आहे, त्याविषयी इथे बोलणं योग्य नाही. मी या मंचावर याविषयी बोलणार नाही. हा खूप गंभीर मुद्दा आहे. हे प्रकरण सध्या न्यायालय हाताळत आहे.

## नाना पाटेकरांनी नाकारला एसएस राजामौलींचा चित्रपट

**प्रसिद्ध दाक्षिणात्य चित्रपट दिग्दर्शक एसएस राजामौली यांच्या 'SSMB29' या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चा सुरू आहे. या चित्रपटात महेश बाबू हा अभिनेता एका महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहेत. महेश बाबूच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा चित्रपट असल्याचं म्हटलं जात आहे, तर बॉलीवूड अभिनेत्री प्रियंका चोप्रासुद्धा या चित्रपटात दिसणार आहे.**

या चित्रपटात नाना पाटेकरही असणार होते. पण त्यांनी हा चित्रपट करण्यास नकार दिल्याचे वृत्त आहे. राजामौलींनी महेश बाबूच्या



वडिलांच्या भूमिकेसाठी नाना पाटेकरांचं नाव विचारात घेतलं होतं. चित्रपटाबद्दल आणि भूमिकेबद्दल सांगण्यासाठी स्वतः राजामौली नाना पाटेकरांना भेटायलाही गेले होते. राजामौलींनी नानांना संहिताही सांगितली होती आणि नानांना या चित्रपटासाठी २० कोटींचं मानधन ऑफर करण्यात आलं होतं. मात्र, नानांनी राजामौलींच्या चित्रपटाची ही ऑफर नाकारली आहे. राजामौलींनी ऑफर केलेल्या भूमिकेत वेगळं काही करण्यासारखं नसल्याने त्यांनी चित्रपटातून एक्झिट घेतली. राजामौली यांच्या 'SSMB29' या चित्रपटातून नाना पाटेकरांनी एक्झिट घेतली असली, तरी त्यांनी भविष्यात या दिग्दर्शकाबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. राजामौलींच्या 'SSMB29'च्या चित्रीकरणाला जानेवारी महिन्यात सुरुवात झाली आहे. प्रियांकाने महेश बाबूबरोबर हैदराबादमध्ये काही दृश्यांचं चित्रीकरण केलं होतं, तर ओडिसामध्येही काही दृश्ये चित्रीत झाली आहेत. दरम्यान, 'SSMB29' या चित्रपटाचे बजेट सुमारे १००० कोटी रुपये असण्याची अपेक्षा आहे. राजामौली यांच्या 'आरआरआर' चित्रपटाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त म्हणजेच, २५ मार्च २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचं म्हटलं जात होत. मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.

## आजार अंगावर काढू नका...

**सोनाली बेंद्रेचा महिलांना कर्करोगाबद्दल मोठा सल्ला**

अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिने ९० च्या काळात तिच्या अभिनयाने व सौंदर्याने अनेकांची विशेषतः तरुणांची मनं जिंकली होती. आजही तिची क्रेझ कमी झालेली नाही. आजही तिचे सिनेमे प्रेक्षक तितक्याच आवडीने पाहतात. अशातच नुकतीच सोनाली बेंद्रे दिग्दर्शिका फराह खानच्या डिजिटल चॅनेलवरील व्हिडीओमध्ये झळकली. तिने फराह खानसह संवाद साधताना तिला झालेल्या कर्करोगाबद्दल सांगितलं आहे.

२०१८ साली सोनाली बेंद्रेला कर्करोगाचं निदान झाल्याचं समोर आलं होतं. त्यावेळी ती कर्करोगांच्या चौथ्या स्टेजला होती. परंतु, कर्करोगासारखा आजार झाला आहे हे कळल्यावर तिचा नवरा गोल्डी बहल तिला परदेशात उपचारासाठी घेऊन गेला. वैद्यकीय उपचारांनी सोनालीच्या तब्येतीत सुधारणा झाली. फराह खान म्हणाली, की तू आम्हाला खूप मोठा धक्का दिला होता. मी तेव्हा खूप घाबरले होते. पण सोनाली एवढी निडर मुलगी मी अजून पाहिली नाही. पण, आता तुला पुन्हा आधीसारखं पाहून बरं वाटतंय. तू आज सगळ्या महिलांना काय सांगशील? त्यावर सोनाली म्हणाली, की मला बरेच दिवस त्रास होत होता. पण आपण नेहमीच आज वेळ नाहीये, नंतर जाऊ असं म्हणत दुर्लक्ष करत होते. त्यावेळीच मी काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवं होतं. त्यामुळे कर्करोग आहे हे उशिरा समजलं. कर्करोगातून बाहेर यायचं असेल तर सुरुवातीलाच हलगर्जीपणा न करता काळजी घेणं महत्त्वाचं असतं, असं ती म्हणाली. दरम्यान, अभिनेत्री सोनाली बेंद्रेबद्दल बोलायचं झालं तर तिने बॉलीवूडमधील अनेक बड्या कलाकारांबरोबर मोठ्या पडद्यावर काम केलं आहे. सोनालीने १९९४ साली 'आग' या चित्रपटातून पदार्पण केलं होतं. यामध्ये तिच्यासह अभिनेता गोविंदा मुख्य भूमिकेत होता. यानंतर सोनालीने 'सरफरोश', 'किमत', 'अंगारे', 'भाई', 'जीस देश में गंगा रेहता है', 'हम साथ साथ है', 'अनाहत', 'अगं बाई अरेच्चा' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तिने हिंदीसह, मराठी व दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांतही काम केलं आहे.

## करण जोहरच्या नवीन चित्रपटाची घोषणा!

### मुख्य भूमिकेत जान्हवी कपूर अन् टायगर श्रॉफ

**बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूर सध्या चर्चेत आहे. याचं कारण म्हणजे कान्स फिल्म फेस्टिव्हलमधील तिचं पदार्पण. करण जोहरची निर्मिती असलेल्या 'होमबाऊंड' चित्रपटाच्या निमित्ताने जान्हवीने करण जोहर, इशान खट्टर यांच्यासह कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये हजेरी लावली होती. त्यावेळी तिच्या लूकची सोशल मीडियावर प्रचंड चर्चा झाली.**





अशातच आता जान्हवी कपूर लवकरच एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. राज मेहता दिग्दर्शित व करण जोहरची निर्मिती असलेल्या 'लग जा गले' या चित्रपटातून जान्हवी कपूर व अभिनेता टायगर श्रॉफ पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहेत. 'गुड न्यूज' आणि 'जुग जुग जीयो' या चित्रपटांनंतर दिग्दर्शक राज मेहता यांचा 'लग जा गले' हा चित्रपट येणार आहे. 'लग जा गले' हा चित्रपट एक ॲक्शन लव्हस्टोरी असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून चित्रपटाच्या कथेवर काम सुरू असून या चित्रपटासाठी त्यांना अशी जोडी हवी होती, ज्यांनी पूर्वी एकत्र काम केलेलं नाहीये. त्यामुळे या चित्रपटाकरता त्यांनी जान्हवी कपूर व टायगर श्रॉफ यांना विचारलं आणि स्क्रिप्ट ऐकल्यानंतर दोघांनीही चित्रपटासाठी लगेच होकार दिला. जान्हवी व टायगर हे दोघे पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत. यापूर्वी त्यांनी कधीही एकत्र काम केलं नव्हतं. त्यामुळे या फ्रेश जोडीची ऑनस्क्रिन केमिस्ट्री कशी असेल हे पाहणं रंजक ठरेल. जान्हवी व टायगर यांनी जरी एकत्र काम केलं नसलं तरी त्यांच्या पालकांनी मात्र अनेकदा एकत्र चित्रपटांमध्ये काम केलं आहे. दिवंगत अभिनेत्री श्रीदेवी व अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी 'कर्मा', 'रूप की रानी चोरों का राजा', 'हल्ला बोल', 'मैं तेरा दुश्मन', 'जवाब हम देंगे' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. दरम्यान, जान्हवी कपूरच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर ती तुषार जलोटा दिग्दर्शित 'परमसुंदरी' या चित्रपटात झळकणार आहे. यामध्ये तिच्यासह अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा मुख्य भूमिकेत असणार आहे. यानंतर ती अजून एका चित्रपटातून झळकणार आहे. शशांक खेतान दिग्दर्शित 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' या चित्रपटात ती पाहायला मिळणार आहे.

## बिग बींची एकूण संपत्ती किती?

**बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन मागील अनेक दशकांपासून इंडस्ट्रीत सक्रिय आहेत. आपल्या करिअरमध्ये शेकडो सुपरहिट चित्रपट देणारे अमिताभ बच्चन एकेकाळी दिवाळखोर झाले होते, पण आता त्यांच्याकडे हजारो कोटींची संपत्ती आहे. त्यांनी आतापर्यंत मुंबईत अनेक मालमत्ता खरेदी केल्या आहेत. मागील वर्षापासून ते रामजन्मभूमी अयोध्या येथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत.**



अमिताभ बच्चन यांनी अयोध्येत आधीच तीन भूखंड खरेदी केले होते आणि आता त्यांनी चौथा भूखंड देखील खरेदी केला आहे. अमिताभ यांनी २५,००० चौरस फूट भूखंड खरेदी केला आहे, ज्याची किंमत तब्बल ४० कोटी रुपये आहे. अमिताभ बच्चन यांनी खरेदी केलेला भूखंड सरयू नावाच्या एका रिअल इस्टेट डेव्हलपमेंट एरियात आहे. इथेच बिग बींनी पूर्वीही गुंतवणूक केली होती. अमिताभ बच्चन यांनी अलीकडेच एका रिअल इस्टेट फर्ममध्ये प्रत्येकी १० कोटी रुपये गुंतवले होते. गेल्या वर्षी राम मंदिर उद्घाटनापूर्वी त्यांनी अयोध्येत ५,३७२ चौरस फूट भूखंड खरेदी केला होता, ज्यासाठी त्यांनी ४.५४ कोटी रुपये मोजले होते. सरयू रिअल इस्टेटमध्ये त्यांनी १४.५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. तसेच त्यांनी शहरात ५४,००० चौरस फूटचा भूखंड देखील खरेदी केला, जो त्यांचे वडील हरिवंश राय बच्चन यांच्या ट्रस्ट अंतर्गत नोंदणीकृत आहे. या जमिनीवर वडिलांचे स्मारक बांधण्याची बिग बी यांची योजना असल्याचं म्हटलं जात आहे.

### बच्चन कुटुंबाची मालमत्ता

बच्चन कुटुंबीय मागील अनेक वर्षांपासून मालमत्तेत गुंतवणूक करत आहे, २०२४ मध्ये अमिताभ बच्चन यांनी मुलगा अभिषेक बच्चनबरोबर २५ कोटी रुपयांचे १० अपार्टमेंट खरेदी केले. अभिनेत्री व राज्यसभा सदस्य जया बच्चन यांनी त्यांची एकूण मालमत्ता जाहीर केली होती. निवडणूक प्रतिज्ञापत्रात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या आणि अमिताभ बच्चन यांच्याकडे १,५७८ कोटी रुपयांची संयुक्त मालमत्ता आहे. त्यांच्याकडे जंगम मालमत्ता ८४९.११ कोटी रुपयांची आहे आणि स्थावर मालमत्ता ७२९.७७ कोटी रुपयांची आहे. अमिताभ बच्चन यांनी नुकतंच मुंबईतील अंधेरी भागात ८३ कोटी रुपयांमध्ये एक मालमत्ता विकली. ती त्यांनी २०२१ मध्ये ३१ कोटी रुपयांमध्ये खरेदी केली होती. अमिताभ बच्चन यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोताबद्दल बोलायचं झाल्यास ते चित्रपट, जाहिराती व कौन बनेगा करोडपती होस्ट करून कमाई करतात.

## विकी कौशल झळकणार हरभजन सिंगच्या चरित्रपटात

बॉलीवूड अभिनेता विकी कौशल हा सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांतून विविध भूमिका साकारल्या आहे. आता त्याचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाला आहे आणि त्याच्या प्रेक्षकांच्या त्याच्याकडून खूप अपेक्षाही आहेत. केवळ प्रेक्षकच नव्हे तर अनेक प्रसिद्ध लोकांचाही तो आवडता अभिनेता आहे. प्रसिद्ध माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगनंही नुकतंच विकी कौशलबद्दल वक्तव्य केलं आहे. हरभजन सिंग विकी कौशलबद्दल म्हणाला, की माझ्या चरित्रपटासाठी अभिनेता विकी कौशल योग्य निवड असेल. तो खूप उत्तम अभिनेता आहे. त्यामुळे आता विकी कौशल माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगच्या चरित्रपटात झळकणार का? याचं उत्तर येणाऱ्या काळातच मिळेल. 'छावा' चित्रपटात छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारत विकीने अनेकांच्या मनात जणू कायमचं घर केलं आहे. विकी साकारत असलेल्या प्रत्येक भूमिकेसाठी प्रचंड मेहनत घेत असतो, त्यामुळे त्याने केलेलं काम प्रेक्षकांपर्यंत पोहोचतं. विकी कौशलला नुकतीच बॉलीवूडमध्ये दहा वर्षे पूर्ण झाली आहेत.

## ब्रेकअपनंतर आता अभिनेता करणार अरेंज मॅरेज

'मीतः बदलेगी दुनिया की रीत', 'इश्क सुभान अल्लाह' आणि 'साड्डा हक - माय लाइफ माय चॉइस २' या टीव्ही शोमधून अभिनेता आशुतोष सेमवाल लोकप्रिय झाला. आशुतोष सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबर ब्रेकअप झाल्यानंतर दोन वर्षांनी आशुतोषने साखरपुडा उरकला आहे. आशुतोष अरेंज मॅरेज करतोय. आशुतोष सेमवालच्या होणाऱ्या पत्नीचे नाव मनीषा भट्ट आहे. आशुतोषने मनीषाबरोबर साखरपुडा झाल्याची घोषणा केली आहे. मनीषाबरोबर आयुष्याचा नवीन प्रवास सुरू करण्यासाठी आशुतोष खूप उत्सुक आहे. आशुतोष म्हणाला, की मनीषाच्या रूपात योग्य जोडीदार मिळाल्याने मी खूप आनंदी आहे. आमच्या लग्नाबद्दल आणि तिच्याबरोबर माझे संपूर्ण आयुष्य घालवण्याबद्दल मी खूप उत्साहित आहे. ती मला



प्रेरणा देते, तिला परिस्थितींना कसे सामोरे जायचे हे चांगलंच माहीत आहे. ती आजूबाजूला असली की सकारात्मता वाटते, ती माझ्या आयुष्यात आली यासाठी मी स्वतःला नशीबवान समजतो. मनीषाशी भेट कशी झाली, असं विचारल्यावर आशुतोष पुढे म्हणाला, की आमच्या आई-वडिलांनी आमची ओळख करून दिली होती. त्यावेळी आम्ही लग्नासाठी तयार झालो नाही. काही वैयक्तिक कारणांमुळे, ती तिचे शिक्षण वेळेवर पूर्ण करू शकली नाही आणि सध्या ती एमए (मास्टर ऑफ आर्ट्स) पूर्ण करत आहे आणि मलाही माझ्या अभिनयावर लक्ष केंद्रित करायचे होते. पण आम्ही मित्र म्हणून बोलणं सुरू ठेवलं आणि भेटू लागलो. त्यानंतर आम्ही लग्नासाठी तयार आहोत या निर्णयावर पोहोचलो. आशुतोषच्या कुटुंबात सध्या आनंदाचं वातावरण आहे, कारण त्याच्या बहिणीचं लग्न झालं आणि त्याचा साखरपुडा झाला आहे. आम्ही सर्वजण खूप आनंदी आहोत, कारण २१ एप्रिलला माझी बहीण लक्ष्मीचं लग्न झालं. त्याच्या काही दिवस आधी म्हणजे १४ एप्रिलला माझा साखरपुडा झाला, असं आशुतोष सेमवाल म्हणाला. आशुतोष यापूर्वी अभिनेत्री सिमरन बुधारुपबरोबर रिलेशनशिपमध्ये होता, पण सप्टेंबर २०२३ मध्ये दोघांचे ब्रेकअप झाले.

संजय साखरे,इ.समाज बांधव व नागरिक उपस्थित होते छाया करणसिंह बैस.







**नांदेड**- पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त नाना-नानी पार्क समोरील भारतीय जनता पार्टी महानगर कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजूरकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्र काढण्यात आलेल्या शोभायात्रेत चैतन्यनगर येथून काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे. या शोभायात्रेत आ. बालाजीराव कल्याणकर, अॅड. शिवाजी हाके, जिल्हा प्रमुख गंगाधर बडुरे यांच्यासह विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**(छाया-ज्ञानेश्वर सुनेगावकर)**

# जिल्हाध्यक्षपदी अॅड. किशोर देशमुख यांच्या निवडीनंतर अर्धापुरात जल्लोष



**अर्धापूर (प्रतिनिधी)** -नांदेड उत्तर भाजप जिल्हाध्यक्ष-पदी अॅड. किशोर देशमुख यांची निवड झाल्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नियुक्ती पत्राद्वारे कळविले आहे. जिल्हाध्यक्षपदी अॅड. किशोर देशमुख यांची दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल अर्धापुरात शनिवारी फटाके फोडून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी खा. अशोकराव चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. श्रीजया चव्हाण यांच्या सूचनेवरून नांदेड उत्तर भाजप जिल्हाध्यक्षपदी अॅड किशोर देशमुख यांची निवड झाल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात फटाके फोडून निवडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगरसेवक तुकाराम साखरे, डॉ. विशाल लंगडे, व्यंकटी राऊत, अभिषेक गुरखेल, शिवराज जाधव, रमाकांत हिवराळे, किशोर शहाणे, भाजयुमोचे शहराध्यक्ष तुकाराम माटे, पप्पू देशमुख, वैभव शेंडगे, महेश भुस्से, संदीप बंडाळे, संजय डूबे, बालाजी कानोडे आदींसह अनेकांनी निवडीचे जल्लोषात स्वागत केले आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयात अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**- येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवार, दि. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी पोउपनि तथा जनसंपर्क अधिकारी जळबाजी गायकवाड यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन जनसंपर्क अधिकारी कार्यालयातील पोउपनि सूर्यभान कागणे, पोहेकॉ. संजय सांगवीकर, पोकाँ. विनोद भंडारे यांनी केले होते.

**पान १ वरून...**

**नांदेड जिल्ह्यातील ....**

नायब तहसीलदार (महसूल २) काशिनाथ डांगे यांची बदली माहूर तहसील कार्यालयात नायब तहसीलदार (महसूल-१) पदी करण्यात आली आहे. तर बिलोली तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार (महसूल २) राजेश्वर रामराव पदमवार यांची बदली भोकर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार पदी करण्यात आली आहे.

**माहुरचे यादव नळदुर्गचे तहसीलदार**

राज्यातील तहसीलदार प्रवर्गातील १३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांचा समावेश आहे. यादव यांची धाराशीव जिल्ह्यातील नळदुर्ग अप्पर तहसीलदारपदावर बदली करण्यात आली आहे. किशोर यादव यांनी माहूर येथे शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच रेणुकादेवी मंदिराच्या विकास काम मार्गी लावण्यामध्येही त्यांची भूमिका मोलाची राहिली आहे.


## हरवले आहे

माझी सुदर्शन श्रीरंगराव चौडेकर या नावाचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र व पॅनकार्डच्या मुळ प्रति वजीराबाद ते शिवाजीपुतळा ऑटो प्रवासात हरवला आहे.सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता. सुदर्शन श्रीरंगराव चौडेकर**
**मो.८०८७०६५८४५**

## Change In Name

My old Name is ABHIJIT YEJGE Which now am changing as New Name ABHIJEET LAXMANRAO YEJGE Hence forth My All correspondence will be done as per my new name please consider the same Add-ABHIJEET LAXMANRAO YEJGE SHIV GANGA NIWAS BABA NAGAR MAHATMA PHULE HIGH SCHOOL JAVAL NANDED 431605 MO.9658005050

## Change In Name

My Old Name is - VAIDYA SONI SAMBHAJI---- which now I am changing as New Name -SONALI GANGADHAR PUYED - Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Sign By:At Wadgaon Post Tuppa tq and Dist. Nanded-431601 mo 8421626260

**Mahatma Gandhi Mission's**
**COLLEGE OF COMPUTER SCIENCE & IT,**
**MGM Campus, Near Airport, NANDED 431605**
(Affiliated to S.R.T.M. University, Nanded, Maharashtra)

**ADMISSION NOTICE**

| UG Courses | Link for Registration |
|---|---|
| B.Sc. CS / (BCS) | https://forms.gle/ghiQuTcBFJJkJWLLA |
| B. C. A. | |
| B.Sc. Biotechnology | |
| B.Sc. Bioinformatics | |
| PG Courses | |
| M.Sc. SE /(MCS) | |
| M.Sc. Electronics | |
| M.Sc. Biotechnology | |
| M.Sc. Bioinformatics | |

For BCA, Admission through MAH-CET and registration against probable vacancy
Registration date extended up to 2nd June 2025
(Admission as per merit/ Reservation as per norms)
Contact:- 9881961903, 9960204482, 9823230378, 9421454254, 9158677555

**Principal**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## चुकीची दुरूस्ती

दि.२५/५/२०२५ रोजीच्या दै.गोदातीर समाचार मध्ये पान ५ वर अॅड. विजयराज उत्तमराव कागठीकर यांचे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाले असून त्यामध्ये ग्रामपंचायत नरसी हद्दीतील मालमत्ता क्र.१८८१/२ आरसीसी बांधकाम व पॅरेग्राप २ ध्ये मालमत्तेचे मालक नागोराव बाबाराव हंबर्डे रा.अंजणी ता.बिलोली जि.नांदेड असे नजर चुकीने चुक प्रसिद्ध झाले असून त्याऐवजी मालमत्ता क्र.१९८१/२ व मालमत्तेचे मालक नागोराव बाबाराव हांडे रा.अंजणी ता.बिलोली जि.नांदेड असे दुरूस्त वाचावे.

व्यवस्थापक

## टी. सी. हरवली

माझी नवनाथ बापुराव कंकाळ या नावाची १२ वी पास ची टि.सी.साठे चौक ते आयटीआय ऑटो प्रवास दरम्यान हरवली आहे.सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.-**संपर्क पत्ता. नवनाथ बापुरव कंकाळ रा.खडकुत ता.जि.नांदेड मो.७८२२०१०९८१**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस ह्या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे पक्षकार सौ.विद्या गंगाधर सुकेंवार, रा.नांदेड ता. जि. नांदेड ह्यांनी १) मुमताज बेगम अजिजखॉन उर्फ मुमताजबेगम अजीजखान पठाण व २) हुरुननिसा फेरोजखाँन उर्फ हुरुन्निसा खानम फेरोजखान पठाण व ३) समरिन बेगम अफसरखान उर्फ समररिन फातेमा अफसरखान पठाण, तिघेही रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर जि.नांदेड, ह्यांच्या मालकीची व ताब्यातील मौजे बोरगडी ता. हिमायतनगर शिवारातील शेत गट / सर्वे क्रं. १४७ प्रत्येकी क्षेत्रफळ ०१ हे.५७ आर, आकार ०३.८६ पैसे जमिन ज्याची एकत्रित चतुः : सिमा पुर्वेस - प्रदीप पांडे यांची शेतजमिन, पश्चिमेस - सविता श्रीधरराव चर्लेवार यांची शेतजमिन, दक्षिणेस धानोरा जाणारा पांदन रस्ता व उत्तरेस - नरेश पांडुरंग भुमनवाड आणि विठ्ठल पांडुरंग भुमनवाड यांची शेतजमिन ह्या चतु:सिमेतील शेतजमिन खरेदी करण्यांचा करार केलेला असुन, सदर करारापोटी ईसारा रक्कम पण अदा करण्यांत आलेली आहे आणि लवकरच आमचे पक्षकार वरील मालमत्तेची नोंदणीकृत खरेदी खत करुन घेणार आहेत.

वरील वर्णनाच्या शेतजमिनीबाबत आणि कराराबाबत कोणाला कांही आक्षेप, ऊजरदारी नोंदवुन आपले हितसंबंध दाखविण्यांची आवश्यकता असल्यास त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रकाशित झाले पासुन दहा दिवसाचे आत आमच्याकडे येवुन रितसर लेखी ऊजर वा आक्षेप नोंदविण्यांची तसदीक घ्यावी. मुदतीनंतर आमचे पक्षकार ठरलेला व्यवहार पुर्ण करुन घेतील व त्यानंतर आलेल्या ऊजरदारीस वा आक्षेपास कुठ्लाही अर्थ राहणार नाही ह्याची नोंद घ्यावी. करीता हे जाहिर प्रगटन.

**मार्फत**
**अॅड.डी.एस.पंदलवाड**
**हिमायतनगर**

**जाहीर प्रगटन देणार**
**सौ.विद्या गंगाधर सुकेंवार**
**रा.नांदेड ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन
### उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड या संस्थेचे सभासद श्री प्रदीप वामन व्यवहारे प्लॉटधारक क्र. ८५ हा समान दोन भागात ८५ ए व ८५ बी असे वर्गीकरण करून ८५ ए चा ३० बाय ५० म्हणजेच १५०० चौरस फुट हा अमोल मारोतराव कांबळे यांना विक्री करण्याचा प्रस्ताव आला आहे. तसेच ८५ बी साईज ३० बाय ५० म्हणजेच १५०० चौरस फुट हा अविनाश मारोतराव कांबळे यांना विक्री करण्याचा प्रस्ताव संस्थेमध्ये आला असून, याविषयी कोणाचा उजर, हकरत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आक्षेप उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था म. नांदेड या संस्थेचे अध्यक्ष अथवा सचिव यांच्याकडे दाखल करावा. विहित मुदतीत कोणाचा उजर अथवा आक्षेप प्राप्त झाला नाही तर कोणाचा उजर अथवा आक्षेप नाही असे गृहीत धरून प्रकरण निकाली काढण्यात येईल करिता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी**
**गृहनिर्माण संस्था मर्यादित नांदेड**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./७९९
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१८ मामक्र/ ६४६**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,पोतन्ना विठ्ठल तुंगेवाड रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/ दुकान/ प्लॉट ६४६ वार्ड नंबर १८ आयेशा सिद्दीकी बरकत अहेमद च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर दान पत्र २१६९/२०२५ दिनांक ९/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नबर ५३ , पश्चिम: २५ फुट रोड, दक्षिण : प्लॉट नंबर ८७ , उत्तर :३० फुट रस्ता ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./७९८
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१५ मामक्र/ ९१४**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,तसलीम बेगम इलीयास शेख २.शबाना परविन शेख मतीन रा.उमरी, अदिलाबाद यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/ दुकान/ प्लॉट ९१४ वार्ड नंबर १५ अब्दुल गुलाम नबी यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी दान पत्र ७१९/२०२५ दिनांक १३/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर २३, पश्चिम: दुसऱ्याची जमिन ,दक्षिण :२० फुट रस्ता , उत्तर :प्लॉट नंबर २१

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./७३६
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१५ मामक्र/ ९२८**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,नसीम बेगम मोहमद सिद्दीकी २.नुरजहा बेगम शहाबाज खान रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ९२८ वार्ड नंबर १५ अब्दुल मलिक गुलाम नबी च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर दान पत्र ७१७/२०२५ दिनांक १३/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -दुसऱ्याची जमिन , पश्चिम: ३० फुट रोड, दक्षिण : २० फुट रोड , उत्तर :प्लॉट नंबर २७ ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./७९५
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१५ मामक्र/ ९३०**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,रूफी अरफीन अब्दुल जीशान २. इशरत जहा अब्दुल खालीद रा.हिमायतनगर व हैद्राबाद ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/ दुकान/ प्लॉट ९३० वार्ड नंबर १५ अब्दुल मलीक गुलाम नबी यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी दान पत्र ७२०/२०२५ दिनांक १३/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -ओपन स्पेस, पश्चिम: प्लॉट नंबर ३८ , दक्षिण :दुसऱ्याची जमिन , उत्तर :२० फुट रोड

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०५
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.११ अ मामक्र/ २२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,ज्योती अंबादास हनवते रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २२ वार्ड नंबर ११ अ ऋषिकेश पूंडलिक कदम

श्री.शेख शकील शेख अहेमद च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर १९८२/२०२५ दिनांक ८/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे. किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -संतोष, पश्चिम: रस्ता, दक्षिण : रस्ता , उत्तर :१५ फुट बोळ

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०४
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१८ अ मामक्र/ ७१२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,मोसीन सय्यद वाजीद रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ७१२ वार्ड नंबर १८ अ श्री.शेख जहुर व शेख मसुद व इतर यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी बक्षीस खरेदी पत्रक ६१९/२०२५ दिनांक १६/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रस्ता, पश्चिम: प्लॉट नबर ९२, दक्षिण :प्लॉट नबर १०५ , उत्तर :मेरी माता

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./७९७
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१५ मामक्र/ ९३२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,तसलीम बेगम इलियास शेख २.नसीम बेगम मोहमद सिद्दीकी रा.उमरी, निझामाबाद ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/ दुकान/ प्लॉट ९३२ वार्ड नंबर १५ अब्दुल गुलाम नबी च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा ७१८ दिनांक -/-/- च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नबर ३८, पश्चिम: प्लॉट नंबर ४० , दक्षिण : दुसऱ्याची जमिन , उत्तर :२० फुट रोड,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०१
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१८ मामक्र/ ६९८**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, शेख मुस्तपा रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ६९५ वार्ड नंबर १८ श्री.शेख मसुद शेख मोहीदीन यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी बक्षीस पत्रक ७२१/२०२५ दिनांक १६/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -कॉलनी रस्ता, पश्चिम: सलीम चाउस , दक्षिण :प्लॉट नंबर ८८ , उत्तर :प्लॉट नंबर ९०

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८००
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१८ अ मामक्र/ ६८१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अन्तुम सुलताना अजर खान रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/ दुकान/ प्लॉट ६८१ वार्ड नंबर १८ अ शेख जहूर व शेख मसुद व इतर च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर दान पत्र ५५८/२०२५ दिनांक १६/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा

पुर्वे -शेख अजिम , पश्चिम: प्लॉट नंरब ७४, दक्षिण : प्लॉट नंबर ७२ , उत्तर :रस्ता ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०२
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१५ मामक्र/८७**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, राजाबाई सुभाष राखा रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ८७ वार्ड नंबर १५ अरजुमंद अबजलखान यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी दान पत्र १९८३/२०२५ दिनांक ८/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -नगरपालिका क्र.१०३, पश्चिम: रस्ता , दक्षिण :नगरपालिका क्र.८८, उत्तर :नगरपालिका क्र.८६

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०३
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१० अ मामक्र/८४**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,तालीब बेग अली बेग रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ८४ वार्ड नंबर १० अ शंकुतला साहेबराव बनसोडे च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर हिबानामा २११६/२०२५ दिनांक १३/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -नगरपालिका क्र.८३, पश्चिम: मालमत्ता क्र.८५, दक्षिण :कॉलनी रस्ता , उत्तर :मालमत्ता क्र.७८,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत हिमायतनगर**
जा.क्र./८०६
**नाव परिवर्तन करणे बाबत**
**वार्ड क्र.१४ मामक्र/ ९५७/१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,रेशमा कौसर शेख हुसेन रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३५७/१ वार्ड नंबर १४ फैमुदा बेगम इस्माईल खान यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी बक्षीस पत्रक हिबानामा २०२५ दिनांक १४/५/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ३५८, पश्चिम: हिनाबी, दक्षिण :प्लॉट नंबर ३५४ , उत्तर :कॉलनी रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**


शिवसेना
नांदेड उत्तरचे लोकप्रिय आमदार मा.श्री.
बालाजी कल्याणकर साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
मन:पुर्वक शुभेच्छा..!
वाढदिवस
अभिष्टचिंतन सोहळा
दि. १ जून २०२५ वेळ : दु. १२:०० ते ०५:०० वा.
स्थळ : आर्शिवाद गार्डन, रिंग रोड, छत्रपती चौक, नांदेड.
• विनित : शिवसेना- युवासेना नांदेड उत्तर मतदार संघ •


श्री. देविदास गंगाधरराव पवार
(आयुक्त, महानगरपालिका)
सेवापुर्ती
सोहळा
रविवार, दिनांक : १ जुन २०२५, वेळ : सकाळी १०.३० वा.
स्थळ : कुसूम सभागृह, व्हि.आय.पी. रोड, नांदेड.
विनीत
कामाजी पवार
राष्ट्रीय अध्यक्ष, मराठा सेवा संघ
उध्दवराव पवार
मा.संचालक, कृ.उ.बा.समिती, मुदखेड)
डॉ.विश्वंबर पवार
संचालक, निवघेकर आयुर्वेदिक हॉस्पिटल,नांदेड
व समस्त पवार निवघेकर परिवार
रा. निवघा, ता.मुदखेड, जि. नांदेड


नांदेड उत्तर मतदार संघाचे जनसेवक आमदार
मा.श्री.बालाजीराव
कल्याणकर साहेब
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
प्रल्हाद जोगदंड
जिल्हाप्रमुख, शिवसेना वै.आ.
नारायण कदम
जिल्हाध्यक्ष नांदेड, सरपंच परिषद मुंबई